# राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि त्यांच्या टीकाकारांमधील संबंध

**डॉ. अरुण योगेश्वर जाधव**, सहाय्यक प्राध्यापक, र. भा. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना**

भारतात वर्धमान महावीर, तथागत गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर इत्यादी महान विभुतींचा जन्म झाला. त्याचप्रमाणे 20 शतकातील जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधी तथा मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म झाला. महात्मा गांधीजींवर आजवर जगातील विविध भाषांमधून जवळपास एक लाखापेक्षा अधिक पुस्तके लिहीली गेली. सातत्याने अनेक मासिके, नियतकालिके, फेसबुक, व्हॉट्सअप इ. आणि जगभर महात्माजींच्या भूमिकांची चर्चा केली जाते. जगभरातील सहाशेहून अधिक विद्यापीठांमध्ये महात्मा गांधी आणि त्यांचे विचार शिकविले जातात. गांधीजींच्या हयातीत आणि नंतरही जगात कुणालाही लाभले नाहीत एवढे अनुयायी त्यांना लाभले आहेत. जगभरातील अनेक विचारवंताना महात्मा गांधी प्रेरणास्थान आणि श्रध्दास्थान वाटत राहिले. अनेक विचारधारेशी विचारवंतानी त्यांच्यावर टीका देखील केलेली आहे. 30 जानेवारी 1948 रोजी नथूराम गोडसे या माथेफिरुने गोळया घालून त्यांची हत्या केली. संयुक्त राष्ट्र संघटना त्यांचा स्मृतीदिन हा "शांतता दिन" म्हणून पाळते. तर त्यांचा हा दिवस भारतात "हुतात्मा दिन" पाळला जातो. तेव्हा या महान व्यक्तीमत्वाचे विचार आणि त्यांचे टीकाकार यांच्या विचारधारेतील संबंध सदर शोध निंबंधामध्ये पाहणार आहोत.

**❖ शोध निबंधाची उदिष्टये :-**

1) महात्मा गांधीजीची विचारधारा समजून घेणे.
2) भारतातील विविध विचारधारा आणि महात्मा गांधीजींच्या टीकाकारांच्या भूमिका अभ्यासणे.

**❖ राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची विचारधारा:-**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा जीवन प्रवास अभ्यासताना, तीन टप्पे करता येतील. त्यातील पहिला टप्पा त्यांचे बालपण आणि शैक्षणिक प्रवास या होय. या काळात गांधीजी एक सामान्य विद्यार्थी व माणूस म्हणूनच जगले. या काळात त्यांच्यावर त्यांच्या मातोश्रींच्या विचाराचा प्रभाव पडला होता. त्यातूनच नंतर त्यांना सत्याग्रहाचा मार्ग सापडला. दुसरा टप्पा हा आफ्रिकेतील तब्बल 21 वर्षांचा कालखंड मानला जातो. त्यांना आफ्रिकेतील वर्ग लढयाला सामोरे जावे लागले. आफ्रिकेतील वर्ग संघर्ष आणि वंशवादाच्या विरोधात त्यांनी काम केले. त्यासाठी त्यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या सुत्रांचा वापर केला. आफ्रिकेतील यशस्वी लढयानंतर ते भारतात परतले.

तिसरा टप्पा त्यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढयातील सहभागाचा होय. सन 1915 साली गांधीजी भारतात आले. तेव्हा त्यांनी प्रथम ब्रिटीश धोरणांचे स्वागत केले होते. म्हणून त्यांना ब्रिटीश सरकारने "कैसर ए हिंन्द" किताब दिला होता. परंतू जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर हिंद केसरी किताब सरकारला परत केला. स्वातंत्र्य लढयात अग्रभागी राहिले. राष्ट्रीय कॉंग्रेसचे सक्रिय नेते बनले. 1920 नंतर लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व केले. त्यांनी स्वातंत्र्यासाठी सत्य, अहिंसा, असहकार उपोषण इत्यीद मार्गांचा अवलंब केला. आयुष्यभर ते याच तत्वांनी जगत राहिले.

महात्मा गांधीजींच्या हयातीत आणि नंतरही वैज्ञानिक, तत्वज्ञ, ज्ञानवंत, राजकिय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील विचारवंताचा समावेश होतो. महात्माजींच्या बद्दल जगप्रसिध्द वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन म्हणतात की, "गांधी नावाचा माणूस या पृथ्वीतलावर आपली पावले कधी काळी उमटून गेला, हे पुढच्या काळात खरे वाटणारे नाही. " लोकमान्य टिळकांना महात्मा गांधीजींमध्ये भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व करणारा माणूस दिसला. ब्रिटनचे माजी पंतप्रधान विष्टन चर्चिल आफ्रिकेच्या गव्हर्नर जनरल स्मट्सना म्हणतात, "तुमच्या तुरुंगात असताना तुम्ही गांधीचा निकाल लावला असता तर ब्रिटनचे साम्राज्य आणखी काही दशके राहिले असते." मार्टीन ल्यूथर किंग पासून नेल्सन मंडेला पर्यंत आणि बराक ओबामापासून ऑन लॉग हयू की पर्यंत अनेकांना महात्मा गांधी प्रेरणास्थान वाटत आले. पंडित जवाहरलाल नेहरु म्हणतात की, मी

जेव्हा भारतभर भाषणाला जातो तेव्हा जमलेला समुदाय "भारत माता की जय, महात्मा गांधी की जय" अशा घोषणा देतात. यावरुन तमाम भारतीयांच्या मनात गांधीजींनी स्थान निर्माण केले आहे. गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांनी महात्माजींच्या विचाराने प्रभावित होवून महात्मा ही उपाधी दिली. गांधीजींशी वैचारिक संघर्ष करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी त्यांना राष्ट्रपिता ही पदवी दिली. यावरुन त्यांच्या कार्याची थोरवी लक्षात येते.

महात्मा गांधीजींचा समर्थन करणारा अनुयायी वर्ग मोठा होता. त्यामुळे त्यांच्याकडून सर्वच विचारधारेच्या नायकांच्या मोठया अपेक्षा होत्या. त्यामुळे गांधीजींचा समन्वयातून सत्य, अहिंसा, समन्वयातून मानवतावाद हा सर्वांच्या अपेक्षा पुर्ण करु शकत नव्हता. महात्मा गांधीजींच्या प्रमुख टीकाकारांमध्ये ब्रिटीश साम्राज्यवाद, जहाल इस्लामवादी, प्रखर हिंदुत्ववादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी विचारधारेच्या घटकांचा समावेश होता. त्यांच्या टीका आणि महात्माजींचा मानवतावाद यांचा सहसंबंध शोधनिंबधातून मांडण्याचा थोडक्यात प्रयत्न केलेला आहे.

### ❖ भारतातील विविध विचारधारा आणि महात्मा गांधीजींचे टीकाकार :-

1) **<u>साम्राज्यवादी ब्रिटीश</u>** :-

भारतावर जवळपास 150 वर्षे राज्य करणाऱ्या साम्राज्यवादी ब्रिटीशांचा महात्मा गांधीजींच्या ध्येय धोरणांना कडवा विरोध होता. महात्मा गांधीजींनी जालीयनवाला बाग हत्याकांडाचा निषेध केला होता. गांधीजींच्या खिलाफत चळवळ, असहकार आंदोलन, चलेजाव चळवळ या घटना सत्य, अहिंसा, सत्याग्रहाच्या मार्गाने चालविल्या जात होत्या.गांधीजींच्या धोरणांना ब्रिटीश शासक विरोध करीत राहिले. महात्मा गांधीजींना अनेक वेळा अटक काळात तुरुगांत टाकले. परंतू महात्मा गांधीजी कधीही केलेल्या शिक्षाना डगमगले नाहीत. उलट ब्रिटीश अन्यायासमोर अधिक खंबीरपणे उभे राहिले. विस्टन चर्चिल तर गांधीजींचा कडवा विरोधक होता. गांधीजींच्या निशस्त्रीकरण, अहिंसावादी, मानवतावादी सत्याग्रही विचारांपुढे ब्रिटीश साम्राज्याला नमते घ्यावे लागले. कारण ब्रिटीशांना गांधीजीच्या विचारांना समर्पक उत्तरे देणे शक्य नव्हते.

2) **<u>मार्क्सवादी आणि साम्यवादी</u>** :-

जगभरातील मार्क्सवादी कार्ल मार्क्स तत्वज्ञानाला पूर्ण विराम मानतात. भांडवलशाहीमध्ये भांडवलदारांकडून कामगार वर्गांचे शोषक केले जाते. त्यातून शोषक आणि शोषित असे दोन वर्ग निर्माण होतात. त्यामुळे त्यांचा भांडवलशाहीला विरोध होता. भारतातील मार्क्सवाद्यांच्या मते, राष्ट्रीय कॉंग्रेस ही भांडवलशाहीची समर्थक असून गांधी, नेहरु व पटेल हे भांडवलदारांचे हस्तक आहेत. त्यामुळे भारतात विषमता वाढीस लागली आहे. तसेच क्रांतीकारक भगतसिंगच्या फाशीवेळी गांधीजी योग्य तोडगा काढू शकले नाहीत अशीही टीका केली जाते.

मात्र गांधीजींनी भगतसिंगाची फाशी थांबविण्याचा प्रयत्न केला होता हे संशोधनाने सिध्द झाले आहे. मार्क्सवादी हे समता प्रस्थापित करण्यासाठी हिंसा अमान्य करीत नव्हते. लेनिन आणि स्टॅलीन ने समतेसाठी मार्क्सवाद रुजविण्यासाठी रशियामध्ये पाच कोटी माणसांची हत्या केली होती. म्हणूनच महत्मा गांधीजींना मार्क्सवाद मान्य नव्हता. मार्क्सवादाच्या सशस्त्र क्रांतीच्या धोरणाला उत्तर देताना गांधजी म्हणतात, मार्क्सवाद हा समुहापाशी सुरु होवून व्यक्तींपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतो, परंतू तो व्यक्तीपर्यंत पोहचत नाही. कारण त्यामध्ये हिंसेला प्राधान्य असते. गांधीजींचे समन्वयवादी समतेचे मानवतावादी तत्वज्ञान समुहापाशी सुरु होवून व्यक्तीपर्यंत पोहचते. व्यक्तीच्या समस्या जाणून घेते. माणसांची दुरुस्ती केली की, समाज आपोआप सुधारतो.

मार्क्सवाद्यांच्या मते भांडवलदारांना विरोध केला पाहीजे. याला गांधीजींनी ग्रामस्वराज्य संकल्पनेतून उत्तर दिले आहे. भांडवलदारांना विरोध करुन भांडवलशाहीतील शोषण संपवता येणार नाही तर भांडवलदारांमध्ये विश्वस्ताची कल्पना रुजविल्यास शोषण थांबून समतेवर आधारित विकास होईल. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याचा इतका प्रभाव पडला की, स्वत:ला मार्क्सवादी किंवा समाजवादी समजणाऱ्या मंडळी महात्मा गांधीजींचे अनुयायी झाले. मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्ष 1925मध्ये स्थापन होवून देखील त्यांना भारतात प्रभाव पाडता आला नाही.

3) **मुस्लिम लीग** :-

भारतात मुस्लिम लीग ची स्थापना 1906 मध्ये झाली. परंतू मुस्लिम लीगच्या स्थापनेपूर्वीपासूनच धर्माच्या वेगळेपणातून विभक्त मतदार संघ मागणे, पुढे त्यांची संख्या वाढवून मागणे, आपले राष्ट्रीयत्व वेगळे असल्याचे जाणवून देणे, भारताचे स्वातंत्र्य दृष्टीक्षेपात आल्यानंतर वेगळया पाकिस्थानची मागणी करणे त्यांची निती होती. इस्लाम नेते महात्मा गांधीजींना आणि राष्ट्रीय कॉंग्रेसला हिंदू नेते समजत. मुस्लिम संत शाह वल्लीवल्ला म्हणत होता की, " येथे एक तर मुसलमान राहतील किंवा हिंदू राहतील" मुस्लिम मौला, मौलवी, नेते इतका कर्मठ आणि फूटीरतावादी विचार मांडत होते. फाळणीला गांधीजींचा विरोध आहे हे पाहून बॅ. जीनानी कृती दिन (ॲक्शन डे) जाहीर केला होता. पाक निर्मितीसाठी कत्तली करण्यास सुरुवात केली होती. अशा घातक परिस्थितीतही गांधीजी मुस्लिम नेते व धर्मगुरुना समन्वयवादी, मानवतावादी, अहिंसात्मक विचार मांडून अखंड भारताची संकल्पना समजून देत होते. आज पाकिस्थान स्वतंत्र राष्ट्र असले तरी तेथील मुस्लिमांपेक्षा भारतातील मुस्लिम अधिक सुरक्षित आहेत हे गांधी विचाराचे फलित आहे. मुस्लिम नेते गांधीजींना हिंदू समर्थक आणि मुस्लिम व्देष्टे ठरवू लागले होते. परंतू गांधीजींनी खिलाफत चळवळ, नौखालीतील जातीय दंगली वेळी अल्पसंख्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेणारी भूमिका कट्टरतावाद्यांना उत्तर देणारी ठरली. आज मुस्लिम लीग गांधीजींची भूमिका पटू लागली आहे. कारण मुस्लिम लीग गांधी जयंती साजरी करीत आहे.

❖ **कट्टर हिंदुत्ववादी :-**

हिंदू धर्म आणि हिंदूत्व या गोष्टी सुमारे पाच हजार वर्षापुर्वीच्या प्राचीन आहेत. तरीसुध्दा कट्टर हिंदूत्वाचा विचार 1906 मध्ये प्रथम मांडण्यात आला. मुस्लिम लीगच्या स्वतंत्र मतदार संघ व स्वतंत्र राष्ट्र मागणीला विरोध करण्यासाठी स्वांतत्र्यवीर सावरकरांच्या पुढाकारांने हिंदू महासभेची स्थापना झाली. सुरुवातीला राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या ठिकाणीच दुसऱ्या दिवशी हिंदू महासभेची अधिवेशने होत असत. बहुतेक वेळा कॉंग्रेसचे अध्यक्ष हेच हिंदू महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष असत. मुसलमान हे भारताला मातृभूमी मानत असले तरी पितृभूमी मात्र मक्केलाच मानतात. मुस्लिम साम्राज्य प्रबळ होवू नये म्हणून हिंदू महासभा कार्यरत होती. भारत हा मूळचा हिंदूस्थान आहे. त्यामध्ये हिंदू बहुसंख्य नव्हे तर सर्वव्यापी आहेत. म्हणून भारत हे हिंदू राष्ट्र असावे अशी भूमिका होती. "रणाविना स्वातंत्र्य कोणास मिळाले" हे बीद्र घेवून सशस्त्र क्रांतीतूनच स्वातंत्र्य लढा उभा करण्याचे काम हिंदू महासभा आणि कट्टर हिंदूत्ववाद्यांनी केले. त्यांचा गांधीजींच्या सत्याग्रह, उपोषण, आंदोलन या गोष्टींना विरोध होता. गांधीजींचा सर्वसमावेशक मानवतावाद त्यांना मान्य नव्हता. फाळणीच्या वेळी पाकिस्थानला 55 कोटी रु. देण्यासाठी गांधीजींनी केलेले उपोषण त्यांना मान्य नव्हते. कट्टर हिंदूत्ववाद्यांना गांधीजी हे हिंदू व्देष्टे तर मुस्लिमधार्जिणे वाटत. कट्टर हिंदूत्ववाद्याचा विरोध इतका तीव्र झाला की 30 जानेवारी 1948 रोजी नथूराम गोडसे या कट्टर हिंदूत्वाद्याने गोळया झाडून त्यांची हत्या केली असे असले तरी संपूर्ण भारत हा कट्टर हिंदूत्ववाद्याच्या मागे संपूर्णपणे उभा राहू शकला नाही. उलट आज कट्टरता वाद्यांनी सुध्दा सर्वसमावेशक मानवतावाद स्वीकारला आहे. त्यामुळे भारतात हिंदू-मुस्लिम एकत्र गुण्यागोविंदाने राहतात.

❖ **आंबेडकरवादी :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च विद्याविभूषित कुशाग्र बुध्दीमत्ता लाभलेले स्वयंभू नेते होते. भारतात जातीयता मोठया प्रमाणात असल्यामुळे दलित, वंचित आणि शोषित वर्ग उपेक्षित राहिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते देशात प्रथम जाती निर्मुलन होवून समता प्रस्थापित व्हावी. नंतर स्वातंत्र्याचा विचार व्हावा. गोलमेज परिषदेमध्ये त्यांनी दलितांना स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. ही मागणी महात्मा गांधीजींना मान्य नव्हती. महात्मा गांधीजींच्या मते, दलित वर्ग हा हिंदू समाजाचा अविभाज्य भाग आहे. जातीभेद निर्मुलन करुन समता प्रस्थापित करणे हा आपला अंतर्गत प्रश्न आहे, तो आपापसातील चर्चेने सोडविता येईल. प्रथम राजकिय स्वातंत्र्य मिळावे. बाबासाहेब आंबेडकर मात्र राखीव मतदार संघाबाबत ठाम राहिले. तेव्हा गांधीजींनी त्यांच्या

या भूमिकेविरुध्द आमरण उपोषण केले. बाबासाहेबांनी महात्माजींचा जीव वाचविण्यासाठी राखीव जागांबाबत माघार घेवून पुणे एक्य करार केला. तेव्हापासून आंबेडकरवादी हे महात्मा गांधीजींवर टीका करतात.

परंतू महात्मा गांधीजी दलितांच्या प्रश्नाबाबत अधिक जागरुक होते. त्यांनी जातीभेद निर्मुलन व समतेच्या विचारासाठी हरिजन साप्ताहिक सुरु केले होते. इतकेच नव्हे तर फक्त आंतरजातीय विवाहालाच उपस्थित राहण्याचा निर्णय घेतला होता. महात्माजींचे मानवपुत्र महादेवभाई देसाई यांच्या पुत्राच्या सजातीय लग्नाला जाण्यास नकार दिला होता. आधुनिक आंबेडकर वादी आता स्वीकारतात की, "आम्ही गांधीजीवर टीका करुन अन्यायच केला, त्यांचा विधायक विचार समजून घेतला असता तर आजचे अनेक सामाजिक प्रश्न सुटले असते. यावरुन असे म्हणता येईल की, टीका करणारे आंबेडकर वादी देखील महात्माजींचा विचार स्विकारायला लागले.

## ❖ संशोधन पध्दती :-

सदरचा शोध निबंध लिहिण्यासाठी महात्मा गांधीजीवर लिहिलेली संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, यु-ट्युब व्हीडीओ, इंटरनेट वेबसाईट्स यांचा आधार घेतलेला आहे. हा शोधनिंबध पूर्णत: दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारित आहे.

## ❖ सारांश -

महात्मा गांधीजींवर ब्रिटनचे तत्कालिन पंतप्रधान विस्टन चर्चिल, कट्टर इस्मामिक नेते बॅ. जीना व त्यांचे सहकारी, कट्टर हिंदूत्ववादी बॅ. स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभेचे कार्यकर्ते, मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी इ. अनेक वेगवेगळया विचारधारेच्या विचारवंतानी, कार्यकर्त्यांनी टीका केलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय कॉग्रेस मधील काहीजण गांधीजींच्या विचारांशी सहमत नसत. तरीसुध्दा गांधीजी आपल्या विचारांपासून कधीही विचलित झाले नाहीत. विचारांशी तडजोड केली नाही. म्हणूनच रविंद्रनाथ टागोर त्यांना महात्मा ही पदवी देतात तर नेताजी सुभाषचंद्र बोस हे राष्ट्रपिता संबोधतात. यावरुन त्यांच्या विचाराची थोरवी लक्षात येते.

## ❖ संदर्भ -

1) मोहनदास करमचंद गांधी - माझे सत्याचे प्रयोग
2) सुरेश व्दादशीकार - गांधीजी आणि त्यांचे टीकाकार
3) तुषार गांधी- लेट्स किल गांधी
4) चंद्रकांत वानखेडे- गांधी का मरत नाहीत.